Volume 4 | Issue 7 | Jan 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# *माण–खटाव तालुक्यातील पाणी प्रश्न : आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती*

*सुर्यवंशी एस. आर. , काळेल एन. एस.*

सहाय्यक प्राध्यापक , रयत शिक्षण संस्थेचे, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा,

*सांराश*

दुष्काळी भागाचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणे हा शासनाचा भविष्यातील अजेंडा असला पाहिजे, दुष्काळी भागातील गावांच्या भौगोलीक रचनेचा संशोधनात्मक पध्दतीने अभ्यास करून त्या ठिकाणी जलक्रांती करणे आवश्यक आहे. सिमेंट बंधारे, मातीचे बंधारे, शेततळी, बांधबंधीस्ती इत्यादी अनेक प्रकारची कामे करणे आवश्यक आहे. दुष्काळी भागातील लोकांचे जीवनमान सुखी आणि समाधानी करण्यासाठी तेथील लोकांच्या हाताला काम देण्यासाठी रोहयो (रोजगार हमी योजना) अत्यंत योग्य प्रकारे योजना राबविणे आवश्यक आहे. शासनाने योग्य प्रकारची ध्येय धोरणे आखुन त्याप्रमाणे नियोजनबध्द पध्दतीने उद्दिष्टांची निश्चिती करणे आवश्यक आहे. शासनाने योग्य वेळी योग्य अशा प्रकारचे मोठमोठे प्रकल्प हाती घेऊन त्यातुन लोकांच्या हाताला कामे देण्याच्या उद्देशाने प्रयत्न करणे त्याचबरोबर उद्दिष्टांची पुर्तता करणे आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये नादुरूस्त असणारे बंधारे, रस्ते, नळ योजना, पाणी उपसा यंत्र (बोअरवेल) यांची योग्य प्रकारे दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

### *प्रस्तावना :*

माण तालुक्यातील जास्तीत जास्त लोकसंख्या ही ऊसतोडणी मजुर असून त्यांच्या हाताला काम कसे मिळेल यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. सातारा जिल्हयातील माण–खटाव हा भाग कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त भाग असताना देखील त्याकडे जेवढे लक्ष दयायला हवे आहे तेवढे लक्ष दिले गेलेले नाही त्यामुळे, तेथील भागाचा विकास झालेला दिसत नाही. सर्वसमावेशक धोरण आणि सामाजिक वंचितता इत्यादीविषयी शासनाने पुढाकार घेऊन कमी उत्पन्न गटातील व्यक्तींना शासनाच्या विविध योजना राबवून त्याचा योग्य व पुरेपुर वापर त्यांच्याकडुन केला जातो का? याचाही पुनर्रआढावा घेणे आवश्यक आहे. देशातील अनेक शासनाच्या सोई–सवलती पासून वंचित असलेल्या समाजातील लोकांना त्यांच्या आर्थिक विकासाच्या योजना त्यांच्यापर्यत पोहचविणे आवश्यक आहे. माण तालुक्याचा विकास करण्यासाठी आधिकाऱ्यांबरोबर पदाधिकाऱ्यांनी ही मोठया प्रमाणात लक्ष केंद्रीत करून त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. माण तालुक्याचा दुष्काळ हटवायचा असेल तर तेथील जनतेचा पाण्याचा प्रश्न सोडविला पाहिजे. भारताला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत परंतू, महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील माण आणि खटाव तालुके कायमस्वरूपी दुष्काळी भाग म्हणून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे, देशातील प्रत्येक गावातील प्रत्येक नागरिकाला संधीचा लाभ घेण्याचा समान अधिकार आहे. त्यामुळे, शासन दरबारी असणाऱ्या योजनांची अंमजबजावणी अत्यंत काटेकोरपणे करणे आवश्यक आहे. सातारा जिल्हयातील माण–खटाव तालुक्यातील जास्तीत जास्त जमीन पडीक आहे. त्यामुळे, त्या जमीनीमधून जास्तीत–जास्त उत्पन्न घेण्यासाठी पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविला पाहिजे. सातारा जिल्हयातील उद्योगाला जे पाणी वापरले जाते त्याचा वापर कमी करून ते पाणी जमीनीमध्ये उत्पन्न वाढविण्यासाठी उपयोग करणे आवश्यक आहे.

*पाणी प्रश्न :*

माण तालुक्यातील लोकांचे आर्थिक व सामाजिक विकासाचे उद्दिष्ट पूर्ण करावयाचे असेल तर, शासनाच्या असणाऱ्या अनेक प्रकारच्या योजना पूर्ण कार्यक्षमतेने राबविणे आवश्यक आहे. माण तालुक्यामध्ये अनेक लोकांना त्यांच्या प्राथमिक गरजा त्यामध्ये अन्न, वस्त्र आणि निवारा या पुर्ण करण्यासाठी रात्र-दिवस कष्ट करावे लागते आहे, त्याचबरोबर दुय्यम गरजानांही तोंड दयावे लागते आहे. त्यामध्ये, रस्तांची समस्या, पाण्याची समस्या, बाजारपेठेची समस्या, विजेची समस्या, बँकांची समस्या, शेतीची समस्या, आरोग्याची समस्या, शिक्षणाची समस्या, वाहतूक समस्या, अशा अनेक बाबतीत तेथील लोकांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे, लोकांच्या प्राथमिक गरजाबरोबर दुय्यम गरजांच्याकडेही लक्ष केंद्रीत करून त्या पुर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. माण तालुक्यातील लोकसंख्या ही माठया प्रमाणात ऊसतोडणी करण्यासाठी सांगली, कोल्हापुर जिल्हयामध्ये रवाना होत असल्यामुळे तेथील लोकांना दिले जाणारे रेशनिंग हे कोण वापरते त्याचबरोबर त्याचे वितरण कोणत्या पध्दतीने होते याचा आढावा शासनाने घेणे आवश्यक आहे. रेशनिंग दिल्यानंतर त्यांच्या कार्डावरती नोंद केली जाते काय? त्याचबरोबर तालुकास्तरावरून आलेले रेशनिंग हे किती दिवस स्वस्त धान्य दुकानामध्ये ठेवले जाते? याचाही आढावा घेणे आवश्यक आहे.

माण तालुक्यातील जास्तीत जास्त लोकसंख्या ही मजूरी करून जगते आहे. परंतु, गेली अनेक वर्षे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे, त्यामध्ये पवन चक्क्यांचे प्रमाण वाढल्याने पावसाचे येणारे ढग हे पुन्हा निघून जात आहेत त्यामुळे, पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. या तालुक्यातील जनता ही अनेक प्रकारचे व्यवसाय करून जगते आहे त्यामध्ये, मजूरी करणे, शेळी-मेंढी पालन करणे, ऊसतोडणी करणे, इतरांच्या रानामध्ये काम करण्यास जाणे, विहिर खोदण्याचे काम करणे, गवंडी काम करणे, सुत विणणे, वखारीमध्ये काम करणे, बैलजोडींचा उपयोग करून इतरांच्या शेतीची मशागत करणे, सुतार काम करणे, लोहार काम करणे, चर्मकार उद्योग करणे, कपडे दुकानमध्ये काम करणे, किराणा दुकानमध्ये काम करणे, पिठाची गिरणी चालविणे, वाहतूक करणे, बांगडी व्यवसाय करणे, पिठाची गिरणी चालविणे, वाहतूक करणे, इतरांच्या वाहनांची देखभाल करणे इत्यादींचा समावेश होतो आहे.

*दुष्काळी कलंक :*

दुष्काळी कलंक नष्ट करावयाचा असेल तर माण तालुक्याचा धोरणात्मक विकास आराखडा तयार करणे व त्याची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. येणाऱ्या पुढील भविष्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचे जाळे सर्वत्र पसरविणे व त्यामार्फत तरूणांना चांगल्या शिक्षणाबरोबर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी सर्व समाज घटकांना एकत्रीतपणे संघटीत करून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्याप्रमाणे धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तळागाळातील माणसांनीच एकजूटीने लढा दिला पाहिजे. माण तालुक्यातील लोकांची संस्कृती, त्यांचे आरोग्य, समाजाचे राजकारण, शिक्षण याकडे अतिशय बारकाईने लक्ष केंद्रित करून त्यांचा शाश्वत विकास करण्याच्या दृष्टीकोणातून सातत्याने सर्व स्तरातून प्रयत्न होणे व त्याचबरोबर शासनाच्या धोरणांची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे. माण तालुक्यामध्ये नैसर्गिक संसाधनाचा योग्य वापर करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे आवश्यक आहे. माण तालुक्यातील लोकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वच स्तरातून मोठया प्रमाणावरती प्रयत्न होणे आवश्यक आहे. कारण, माण-खटाव तालुक्यातील दुष्काळ म्हणजे गवताच्या गंजीला लागलेली आग आहे. त्यामुळे, ती आग जोपर्यंत प्रत्यक्षात विझत नाही तोपर्यंत या माण-खटाव तालुक्यातीलच नव्हे तर काम संपूर्ण महाराष्ट्रातील दुष्काळाचे सावट नष्ट होणार नाही. ज्यावेळेस व्यक्ती एका वर्षाचा विचार करतो, त्यावेळस जमीनीमध्ये धान्य पेरणी करतो कारण त्याला सध्याची प्राथमीक गरज पुर्ण करावयाची असते. ज्यावेळस व्यक्ती पुढील दहा वर्षाचा विचार करतो, तेव्हा तो रानामध्ये एका झाडाचे रोपटे लावतो परंतू, ज्यावेळेस व्यक्ती अनेक पिढयांचा विचार करतो त्यावेळेस, घरातील प्रत्येक माणूस हा माणूस म्हणून जगला पाहिजे त्यासाठी तो सुरूवातीस घडला पाहिजे अशा प्रकारची धारणा मनामध्ये तयार करतो आणि त्याप्रमाणे माणूस घडविण्याचे काम करण्यास सुरूवात करतो. त्याप्रमाणे माण-खटाव तालुक्यातील प्रत्येक माणूस हा माणूस म्हणुन जगवायचा असेल तर तेथील सर्वाचा आर्थिक व सामाजिक विकास होणे आवश्यक आहे त्यासाठी तेथील सर्वात महत्वाची समस्या म्हणजे 'पाण्याची टंचाई' आहे त्यामुळे, पाण्यासारखी सर्वात मोठी समस्या सोडविणे तेथील अधिकाऱ्यांनी त्याचबरोबर पदाधिकाऱ्यांनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदविला पाहिजे व त्यापध्दतीने काम करणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक अधिकारी आणी पदाधिकारी यांनी आपल्या कर्तव्याचं आणि जबाबदारीचं कार्य योग्य प्रकारे पूर्ण केले तर खऱ्या अर्थाने समाजातील प्रत्येक व्यक्ती सुखी आणि समाधानी त्याचबरोबर आर्थिक व सामाजिकदृष्टया सक्षम होण्यासाठी आपापल्या कर्तव्याचं आणि जबाबदारीचं योग्य प्रकारे पालन खऱ्या अर्थाने करू शकतात.

*आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती :*

माण तालुक्यातील लोकांच्या आर्थिक विकासाची आस ही सर्वस्तरातील लोकांना लागली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने विकास होऊ शकतो. परंतू, त्यासाठी त्या कामाचा योग्य पाठपुरावाही करणे आवश्यक आहे. समाजामध्ये अनेक प्रकारचे

लोक राहत असतात त्यामध्ये सत्याचा सातत्याने विचार करून त्यांच्या विकासाच्या ध्येय धोरणांचा विचारविनिमय होणे त्याचबारोबर यांच्या जीवनाला विकासाची आस लागली पाहिजे अशा प्रकारची विचारसरणी निर्माण झाली पाहिजे. खऱ्या अर्थाने अतिशय प्राथमिक पातळीवरती पाण्याची गरज आणि त्यासाठी दयावा लागत असलेला लढा ही एक विचार करण्याची वेळ आहे काय? याचाही विचार सर्व स्तरावरती होऊन त्यावरती योग्य पर्याय निवडणे अत्यावश्यक आहे.

माण–खटाव तालुक्याचा विकास झाला पाहिजे असे अनेक स्तरातून अनेक वर्षे बोलले जात आहे. परंतू, प्रत्यक्षात विकास झालेला नाही. कधी संपणार या तालुक्यातील दुष्काळ, कधी थांबणार या तालुक्यातील पाण्याचा टँकर, कधी थांबणार या तालुक्यातील बैलजोडी, कधी उतरणार या तालुक्यातील माळावरती विमान, कधी संपणार या तालुक्यातील बेकारी, कधी मिळणार रोजगार, कधी बांधणार बंधारे, कधी थांबणार पाणी, कधी संपेल आजचा दिवस उजडेल का पावसाचा दिवस त्यासाठी कधी करणार माण–खटाव तालुक्यामध्ये वृक्षलागवड, कधी मिळणार मुक्या जनावरांना वैरण, कधी येईल का वैरण मोकळया माळरानामध्ये, कधी येईल पाण्याचा सुकाळ, कधी होईल माण–खटाव तालुका सुजलाम्.

माण तालुक्यातील लोकांचा सामाजिक आणि आर्थिक विकास करण्यासाठी शासनाच्या उपलब्ध असलेल्या सर्व योजना काटेकोरपणे राबविणे गरजेचे आहे. आर्थिकदृष्टया सक्षमीकरण करण्यासाठी शासनाच्या अनेक योजनांचा योग्य व नियोजनबध्द पध्दतीने वापर करून समाजातील वंचित घटकांचा शाश्वत विकास करण्यासाठी योग्य प्रकारे नियोजन करणे आवश्यक आहे. माण तालुक्यामध्ये अनेक प्रकारची घरे आहेत त्यामध्ये जून्या काळातील घरांची संख्या जादा असल्यामुळे त्यांच्या पुनर्बांधणीसाठी शासनाने जाणीवपूर्वक निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. खेडयातील लोकांचे जीवन शासनाच्या अनेक योजनेमार्फत सक्षमीकरण करणे व कामाचे स्वरूप ठरवून त्यादृष्टीने काम पूर्ण करणे आवश्यक आहे. माण तालुक्यातील खेडयांचा विकास हा शाश्वत होण्यासाठी शहराप्रमाणे ग्रामीण भागांचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजातील वास्तव डोळयासमोर ठेवून खऱ्या अर्थाने माणचा विकास करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. माणसांनी माणसांसाठी कृती करून समाजाचे स्वरूप बदलले पाहिजे.

माण तालुक्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठया प्रमाणावरती वापर करून नवनवीन उद्योगांची निर्मिती करून तरूणांच्या हाताला काम दिले गेले पाहिजे. व त्या दृष्टीकोनातून प्रयत्न करून त्याचा योग्य असा पाठपुरावा केला गेला पाहिजे. तळागाळातील व्यक्तींच्या मानसिकतेचा संशोधनात्मक दृष्टीकोनातुन जाणीवपूर्वक विचार करून त्यांचा चिरंतन विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. परंतु, समाजातील लोकांच्या वाटयाला दुःख आले आहे. परंतु, समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींनी एकत्रित येऊन त्यांचा एकजूटीने विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. सातारा जिल्हयातील माण तालुक्यातील म्हणजे दुष्काळ भाग आहे असे सर्वाच्याकडुन ऐकायला मिळते आहे परंतु प्रत्यक्षात कामाच्यावेळी कमी लोकांचा प्रतिसाद मिळत आलेला आहे. समाजातील अनेक घटकापासून माण तालुका दुर्लक्षित राहिला गेलेला आहे. त्यामध्ये, अर्थिक, सामाजिक, राजकिय, धार्मिक, सांस्कृतीक, कायदेशीर, पर्यावरणीय इत्यादींचा समावेश होतो. खऱ्या अर्थाने राजकीयदृष्टया पाठबळ नसल्यामुळे माणचा विकास खुंटला आहे. सातारा जिल्हयातील तालुक्यांना समान न्याय महाराष्ट्राच्या स्थापनेपासून मिळालेला नाही. त्यामुळे, दुष्काळी भागातील माण तालुका सर्व सोईसुविधाच्या बाबतीत मागे राहिला गेलेला आहे. त्यामुळे, सर्व तालुक्यांना समान न्याय मिळावा यासाठी ध्येयधोरणे ठरवून त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने माण तालुक्यातील जनता पाण्याच्या कमतरतेमुळे परगावी जगण्यासाठी जात आहे. समाजातील जनता पाण्याच्या कमतरतेमुळे परगावी जगण्यासाठी जात आहे. समाजातील शेवटच्या घटकाचा विचार विनिमय होऊन त्यांचा सर्वागीण विकास करण्यासाठी सर्वानी एकत्रितपणे शाश्वत लढा देणे सध्याच्या परिस्थितीमध्ये अत्यंत आवश्यक आहे. सातारा जिल्यातील सर्व तालुक्यांना समान न्याय न दिल्यामुळे खऱ्या अर्थाने विकासात समतोल निर्माण झालेला दिसत नाही. अनेक वर्षापासून माण तालुक्यातील लोकांच्या वाटयाला आलेला दुष्काळ नष्ठ करण्यासाठी तसेच त्यांचा सर्वागीण विकास करण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे. माण तालुक्यातील लोकांचा सर्वसमावेशक विकास करण्यासाठी शासनाच्या विविध योजना अत्यंत प्रामाणिकपणे राबविणे व त्यांची अंमलबजावणी कोणत्या प्रकारे केली जाते याचा पाठपुरावा करून माण तालुक्यातील दुष्काळ हटविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

माण तालुक्यातील लोकांच्या आर्थिक विकासाची आस ही सर्वस्तरातील लोकांना लागली पाहिजे तरच, खऱ्या अर्थाने विकास होऊ शकतो. परंतू, त्यासाठी त्या कामाचा योग्य पाठपुरावाही करणे आवश्यक आहे. समाजामध्ये अनेक प्रकारचे लोक राहत असतात त्यामध्ये, सत्याचा सातत्याने विचार करून त्यांच्या विकासाच्या ध्येय धोरणांचा विचारविनिमय होणे त्याचबरोबर यांच्या जीवनाला विकासाची आस लागली पाहिजे अशा प्रकारची विचारसरणी निर्माण झाली पाहिजे. खऱ्या अर्थाने अतिशय प्राथमिक पातळीवरती पाण्याची गरज आणि त्यासाठी द्यावा लागत असलेला लढा ही एक विचार करण्याची वेळ आहे काय याचाही विचार सर्व स्तरावरती होऊन त्यावरती योग्य पर्याय निवडणे अत्यावश्यक आहे.

दुष्काळी भागातील जनावरांच्या छावण्या जनावरांना चारा, पिण्याच्या पाण्याचे टँकर, सिमेंट बंधारे यासारख्या कामाची योग्य अंमलबजावणी करून दुष्काळ हटवण्यासाठी शासनाने कटिबध्द राहणे आवश्यक आहे. दुष्काळी भागातील लोकांच्यासाठी शाश्वत रोजगार त्याचबरोबर शाश्वत शेती कोणत्याने पध्दतीने करता येईल यासाठी शासनाच्या वतीने प्रामाणिकपणे प्रयत्न होणे आवश्यक आहे. माण तालुक्यातील दुष्काळी भागातील पाझर तलाव, बंधारे, शाळा सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य केंद्रे इत्यादी अनेक प्रकारची कामे शासनाने अत्यंत काटेकोरपणे करणे व त्याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

माण तालुक्यातील प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये दुष्काळ कोणत्यावेळी नष्ठ होईल. दुष्काळातून आपली सुटका होईल

का? दुष्काळ हटविण्यासाठी शासन कोणत्या वेळी प्रयत्न करेल? पाण्याची सोय कधी होणार? शेतीसाठी पाणी कोणत्या पिढीमध्ये उपलब्ध होईल? पाण्यासाठी परगावी जावे लागत आहे त्याची जबाबदारी किंवा नोंद शासन दरबारी घेतली जाईल का? अनेक योजना या शासन पातळीवरती आहेत त्याचा लाभ कधी आम्हाला मिळणार? अशाप्रकारचे अनेक प्रश्न माण-खटाव तालुक्यातील लोकांचे असुन त्यांच्या या प्रश्नावरती शासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रीत करून त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी मोठया प्रमाणावरती प्रयत्न करणे व त्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी व तेथील जनतेचा विकास करण्यासाठी तसेच तेथील जनतेची दोन वेळच्या जेवणाची भूक शमविण्यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. शासनाच्या योजनांचा लाभ मिळाला पाहिजे अशा प्रकारची विचारसरणी तेथील लोकांची असून त्यांना त्याच्या हक्काची जाणीव झालेली आहे त्यामुळे, तेथील अधिकारी आणि पदाधिकारी यांनी या सर्व समाजाच्या कल्याणाच्या योजनांचा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम करून त्यांच्या जीवनामध्ये एक नवीन आशेचा किरण पसरविणे व त्यांचे संपूर्ण आयुष्य बदलून त्यांना पाण्याच्या टंचाईमधून मुक्त करणे सध्याच्या परिस्थितीमध्ये अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी, शासन पातळीवरती मोठया प्रमाणावरती दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे.

***समारोप :***

सध्याच्या परिस्थितीमध्यें महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक भागात पाणी टंचाई मोठया प्रमाणात जाणवत आहे. प्रत्येक वर्षी महाराष्ट्राला मोठया प्रमाणावरती पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. पाणी टंचाईचे प्रमुख कारण म्हणजे नियोजनाचा अभाव होय. उपलब्ध पाण्याचा वापर अत्यंत काटेकोरपणे करुन महाराष्ट्रातील पाणी टंचाई कमी करणे आवश्यक आहे. समाजातील लोकांच्या समस्या कळकळीने सोडविणे तसेच समाजाचे कल्याण करणारे लोकप्रतिनिधी सध्याच्या परिस्थितीमध्ये नसल्यामुळे पाण्यासारखी भीषण टंचाई निर्माण होऊ लागली आहे. लोकांची पाणी ही मूलभूत गरज पूर्ण होत नसेल तर समाजाने दाद मागायची कोणाकडे असा प्रश्न निर्माण होत आहे. महाराष्ट्रामध्ये जलव्यवस्थापन करणे आवश्यक आहे. कारण, पडणारे पावसाचे पाणी साठविण्याची त्याचबरोबर ते पाणी जमिनीमध्ये मूरविण्याची एक मोठी मोहीम आहे. व ते काम पूर्णत्वास नेणे व त्यासाठी त्याचा पाणी पाठपुरावा करणे आवश्यक आहे. पाण्यासारखी सर्वात मोठी आणि गंभीर समस्या सोडवून महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण देशातील पाण्याची समस्या सोडविणे सध्याच्या परिस्थितीमध्ये अत्यंत आवश्यक आहे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org